॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/५६५ दिनांक २२/०२/२०२

**परिपत्रक**

प्रति,

मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.
राष्ट्रीय सेवा योजना राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: MY भारत पोर्टल वर मतदार जनजागृती मोहिमेचे 'नविन उपक्रम' तयार करून अपलोड करणे बाबत.**

संदर्भ: डॉ. अजय बा. शिंदे, क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांचे F.No.17/19/NSS /RD-Pune/2023-24/1081-1136, Dated 12 Feb 2024

महोदय,

उपरोक्त विषयी डॉ. अजय बा. शिंदे, क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांनी संदर्भिय पत्रान्वये भारत सरकार, युवा व्यवहार आणि क्रिडा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार मतदार जनजागृती मोहीम आयोजित करण्यात यावी आणि MY भारत पोर्टलवर मतदार जनजागृतीचे कार्यक्रम अपलोड केले जावेत. या संदर्भात फेब्रुवारी आणि मार्च मध्ये मतदार जनजागृती मोहिमेचे आयोजन, NSS युनिटद्वारे नवीन मतदारांची नोंदणी सुनिश्चित करावी. तसेच मतदार जनजागृती मोहिमेशी संबधित खालील उपक्रम जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा इलक्ट्रोल लिट्रेसी क्लब यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे व माय भारत पोर्टलवर अपलोड करण्यात यावे असे कळविले आहे.

**अ) नवीन मतदारांची मोठया प्रमाणात नोंदणी**
**ब) मतदान आणि ईव्हीएमचे महत्व या विषयावरील सत्रे**
**क) पथनाटय, रॅली, पोस्टर, मतदार जागृतीपर प्रश्नमंजुषा**
**ड) इतर संबधित मतदार जागृती उपक्रम.**

तसेच मायभारत पोर्टलवर–ईव्हेंट तयार करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. माय भारत पोर्टलवर २ नोंदणीकृत असलेले NSS PO माय भारत पोर्टलवर NSS युनिटच्या मतदार जागृती मोहिमेचा कार्यक्रम तयार करतील व सर्व मतदार जागृती आणि इतर उपक्रम फेब्रुवारी २०२४ ते मार्च २०२४ या कालवधी दरम्यान एक कार्यक्रम म्हणून माय भारत पोर्टलवर अपलोड करण्यात यावे असे कळविले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, उपरोक्तपणे नमुद करण्यात आलेले उपक्रम आपल्या महाविद्यालयात जनजागृती मोहिमेचे उपक्रम रा.से.यो. पथकाद्वारे फेब्रुवारी २०२४ ते मार्च २०२४ या कालवधीत जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा इलक्ट्रोल लिट्रेसी क्लब यांच्या समन्वयाने आयोजन करण्यात यावे व माय भारत पोर्टलवर अपलोड करण्यात यावे व त्या बाबतचा अहवाल फोटो, व्हिडिओ, रा.से.यो. विभागास **nss@srtmun.ac.in** या ई–मेलवर पाठविण्यात यावा, ही विनंती.

**डॉ. मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.